## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
## मा. ड प्रभाग समिति
## विशेष सभा
## सभावृत्तांत

दिनांक –२७/०४/२०१८ वेळ : दु.१२.४५

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ड प्रभाग समितीची मा. सभापती निवडीची विशेषसभा शुक्रवार दिनांक २७/०४/२०१८ रोजी दु.१२.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकर रामचंद्र पवळे सभागृहात, मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचे मार्फत नेमणूक केलेले पीठासीन अधिकारी श्री.अशोक काकडे (भा.प्र.से) मुख्य अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण, आगरकर नगर, पुणे ४११००१ यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.ममता विनायक गायकवाड
२. मा. कस्पटे संदिप अरुण
३. मा. बापु उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
४. मा.कुटे निर्मला संजय
५. मा. आंगोळकर सागर सुनिल
६. मा. मुंढे उषा अंकुश
७. मा. कदम शशिकांत गणपत
८. मा. लोखंडे चंदा राजू

याशिवाय श्री.खोराटे विजय एकनाथ, क्षेत्रीय अधिकारी, श्री. सिताराम देवचंद बहुरे, प्रशासन अधिकारी ड प्रभाग समिती, हे उपस्थित होते.

-------

पीठासीन अधिकारी — सन्मा. सदस्य, क्षेत्रीय अधिकारी, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. यासाठी विभागीय आयुक्त यांनी सभेचा पीठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. **ड प्रभाग समिती**च्या सभापती पदाची निवडणूक मुक्त व निर्भयपणे पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेणेबरोबरच त्या कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

| | **सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सुचना करतो.** |
|---|---|
| **प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा )** | मा. ड प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणूक करणेकामी एकूण ३(तीन) नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे |

| अ क्र | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मा. कदम शशिकांत गणपत | मा.मुंढे उषा अंकुश | मा.आंगोळकर सागर सुनिल |
| २ | मा. कदम शशिकांत गणपत | मा.आंगोळकर सागर सुनिल | मा.मुंढे उषा अंकुश |
| ३ | मा. कदम शशिकांत गणपत | मा.ममता विनायक गायकवाड | मा.कुटे निर्मला संजय |

प्रशासन अधिकारी तथा सचिव, सभाशाखा यांनी त्यांना प्राप्त झालेले एकुण ३(तीन) नामनिर्देशन पत्रे पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा. पीठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.

पीठासीन अधिकारी

मा. ड प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त एका उमेदवाराचे ३ (तीन) नामनिर्देशन पत्रांची छाननी करणेत आली असुन अ क्र १ व ३ चे नामनिर्देशनपत्र वैध आहेत. क्र. २ चे नामनिर्देशन पत्र मा. कदम शशिकांत गणपत यांचे आहे. त्यावर त्यांनी स्वाक्षरी केली असुन सुचक म्हणून मा. आंगोळकर सागर सुनिल व अनुमोदक म्हणुन मा. मुंढे उषा अंकुश यांचे नावे आहेत. व त्यांनी नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी केलेली आहे. सुचक व अनुमोदक यांनी नामनिर्देशन पत्र क्र. १ यांना अनुक्रमे अनुमोदक व सुचक असल्याने नियम ३(३) नुसार नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येत आहे.

मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. कदम शशिकांत गणपत हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. उमेदवारी अर्जमागे घेण्यासाठी दुपारी १२.५० ते ०१.०५ याप्रमाणे वेळ देणेत आलेली होती. दिलेल्या वेळेत उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

मा. ड प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. कदम शशिकांत गणपत हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्यामुळे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती, यांची निवडणूक घेणे ), नियम २००७ मधील नियम ६ नुसार मा. कदम शशिकांत गणपत यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभाग समिती सभापती पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात येत आहे.

सही/-

**श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माणविकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८**
**मा.ड प्रभाग समिती**
**विशेष सभा**

ठराव क्रमांक – १ विषय क्रमांक – १

दिनांक –२७/०४/२०१८ विभाग – प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ड प्रभाग समिती सभापती पदाकरिता मा. कदम शशिकांत गणपत या उमेदवाराने एकूण ३ (तीन) नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून अनुक्रमांक १ व ३ चे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये वैध ठरलेली आहेत. व अ.क्र २ चे नामनिर्देशनपत्र छाननीमध्ये अवैध करणेत आलेले आहे. ड प्रभाग समिती सभापती पदाकरीता मा.कदम शशिकांत गणपत हे एकच उमेदवार असल्याने त्यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ड प्रभाग समिती सभापती म्हणून रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-
**श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माणविकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी-१७
क्रमांक : डक्षेका/१३/कावि/ १०४/२०१८
दिनांक :२७/०४/२०१८

सही/-
**प्रशासन अधिकारी**
तथा सचिव सभा शाखा
ड प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८**
**ड प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१८**

ड प्रभाग समिती सभापती पदाकरीता वैधपणे नामनिर्देशित केलेल्या सर्व उमेदवारांची नांवे

| **अ.क्र.** | **उमेदवाराचे नांव** |
|---|---|
| १ | मा. कदम शशिकांत गणपत |

दिनांक - २७/०४/२०१८

सही/-
**श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – ४११ ०१८**
**ड प्रभाग समिती सभापती निवडणूक २०१८**

| अ.क्र | उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे |
|---|---|
| १ | निरंक |

दिनांक – २७/०४/२०१८

सही/-
**श्री.अशोक काकडे (भा.प्र.से)**
पीठासीन अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण विकास प्राधिकरण,
आगरकर नगर, पुणे ४११००१